1	**Loan A/C. No(S). : USFBMUMMSME000021294 1. Sanjeet Textiles Through Its Proprietor Sandeep Ravindra Singh 2. Singh Sandeep Ravindar 3. Ashadevi Ravindra Singh Add For Sr. No. 1 :** . House No 55/4, 1st Floor Bharat Com, Murlidhar Compound Kalyan Road Bhiwandi, Thane Near Jayshree Hotel, Maharashtra – 421305. **Add For Sr. No. 2 & 3 :** Bldg No. D 12 Flat No. 501 & 502 Kailash, Manas Society Mansarovar Bhiwandi, Thane Near Shiv Mandir, Maharashtra – 421305	**21.10.2026 Rs. 57,01,344.00/-** (Rs. Fifty-Seven Lakhs One Thousand Three Hundred Forty Four Only) As On **21.10.2026 NPA Date : 02.10.2026**	**Mortgage Property -1** All That The Pieces And Parcel Of Shop No. 06, Area Adm. 316 Sq. Fts, On Ground Floor, In The Building Known As "Rais Residency", Constructed On Land Bearing City Survey No. 2005, Lying, Being And Situated At Village Bhinwandi, Taluka Bhiwandi, And District Thane. **Mortgage Property -2** All That The Pieces And Parcel Of Shop No. 10, Area Adm. 290 Sq. Fts, On Ground Floor, In The Building Known As "Rais Residency", Constructed On Land Bearing City Survey No. 2005, Lying, Being And Situated At Village Bhinwandi, Taluka Bhiwandi, And District Thane.
2	**Loan A/C. No(S). : USFBMUMMSME000005069 1. Royal Enterprises (Borrower) Represented Through By Sachin Pandurang Kini 2. Sachin Pandurang Kini (Co-Borrower & Mortgagor) 3. Pandurang Jethu Kini (Co-Borrower) 4. Manjula Pandurang Kini (Co-Borrower) Add For Sr. No. 1 :** Shop No. 5, Bholebaba Apartment, S Road, 5, Palghar, Maharashtra 401303. **Add For Sr. No. 2, 3 & 4 :** House No. 206 Tembhikhodave Jalsar Safale W, Palghar, Maharashtra 401102.	**15.10.2026 Rs. 25,74,606.40/-** (Rs. Twenty-Five Lakhs Seventy Four Thousand Six Hundred Six and Fourty Only) As On **15.10.2026 NPA Date : 04.04.2026**	All The Pieces And Parcel Of The Immovable Property Bearing Property House No. 206 Admeasuring Area 4000/- Sq. Ft. Tembhikhode Jalsar, Safale W, Palghar, Palghar Maharashtra – 401102. Safale Taluka, And Dist Palghar – 401404 Within The Local Limits Of Group Gram Panchayat At Jalsar. Boundaries: **East:** On Side Shri The Land Of Ramchandra Pratil, **West:** On Side Gaonthan Land, **North:** On Side House Of Shri. Shivdas Yashwant Patil, **South:** On Side House Of Shri. Deepak Gajanan Patil
3	**Loan A/C. No(S). : USFBMUMMSME000010793 1. Tanasvi Kirana Stores 2. Tanasvi Tushar Patil 3. Tushar Suresh Patil 4. Patil Vandana Suresh Add For Sr. No. 1, 2 & 4 :** . House No. 537, Tushar Patils Home, Girale, Palghar, Maharashtra- 401102. **Add For Sr. No. 3 :** House No. 537, Tushar Patils Home, Girale, Palghar, Umbarpada, Maharashtra- 401102.	**13.08.2026 Rs. 22,61,689/-** (Rs. Twenty Two Lakhs Sixty One Thousand Six Hundred and Eighty Nine Only) As On **13.08.2026 NPA Date : 03.07.2026**	All That The Pieces And Parcel Of Property House No – 537 Admeasuring Area 4250 Sq. Ft. Tushar Patil Home Girale, Palghar, Palghar Maharshtra – 401102. Safale Taluka, And Dist Palghar – 401404. Within The Local Limits Of Group Gram Panchayat Girale Boundaries As Property: **North:** - On Side Main Road, **South :** - On Side Open Space, **East :** - On Side Mrs. Gita Ganesh Patil House, **West :** - On Side Mr. Mukesh Dhundaji Patil House
4	**Loan A/C. No(S). : USFBMUMMSME000013468 1. Sarthak Kirana Store Through Its Proprietor Ashwini Ashish Sase 2. Ashwini Ashish Sase 3. Ashish Narottam Sase Add For Sr. No. 1, 2 & 3 :** . Sases Home, House No 1187 Wasare, Wasare Maswaan, Nr. Shree Ram Sanstha School, Palghar, Opp. S.V.P, Packing Industry Pvt Ltd. Maharashtra 401404	**13.08.2026 Rs. 11,85,752.00/-** (Rs. Eleven Lakhs Eighty Five Thousand Seven Hundred and Fifty Two Only) As On **29.06.2026 NPA Date : 03.07.2026**	All That The Pieces And Parcel Of Property House No – 1187 Admeasuring Area 588 Sq. Ft, Wasare, Maswan, Nr Shree Ram Sanstha School, Palghar, Maharashtra, 401404, Opp. S.v.p. Packing Industry Pvt. Within The Local, Limits Of Group Gram Panvhayat Wasare. Boundaries: **North:** - On Side Mr. Yashwant Lahu Mirka's Farm, **South :** - On Side Mr. Narottam Deo Sase's Farm, **East :** - On Side Mr. Narottam Deo Sase's Farm, **West :** - On Side Main Road

The borrower(s) are hereby advised to comply with the demand notice(s) and to pay the demand amount mentioned therein and hereinabove within 60 days from the date of this publication together with applicable interest, additional interest, bounce charges, cost and expenses till the date of realization of payment. The borrower(s) may note that **USFBL** is a secured creditor and the loan facility availed by the Borrower(s) is a secured debt against the immovable property/properties being the secured asset(s) mortgaged by the borrower(s). In the event borrower(s) are failed to discharge their liabilities in full within the stipulated time, **USFBL** shall be entitled to exercise all the rights under Section 13(4) of the Act to take possession of the secured asset(s) including but not limited to transfer the same by way of sale or by invoking any other remedy available under the Act and the Rules thereunder and realize payment. **USFBL** is also empowered to **ATTACH AND/OR SEAL** the secured asset(s) before enforcing the right to sale or transfer. Subsequent to the Sale of the secured asset(s), **USFBL** also has a right to initiate separate legal proceedings to recover the balance dues, in case the value of the mortgaged properties is insufficient to cover the dues payable to the **USFBL**. This remedy is in addition and independent of all the other remedies available to **USFBL** under any other law. The attention of the borrower(s) is invited to Section 13(8) of the Act, in respect of time available, to redeem the secured assets and further to Section 13(13) of the Act, whereby the borrower(s) are restrained/prohibited from disposing of or dealing with the secured asset(s) or transferring by way of sale, lease or otherwise (other than in the ordinary course of business) any of the secured asset(s), without prior written consent of **USFBL** and non-compliance with the above is an offence punishable under Section 29 of the said Act. The copy of the demand notice is available with the undersigned and the borrower(s) may, if they so desire, can collect the same from the undersigned on any working day during normal office hours.

**Place : Maharashtra
Date : 20.11.2026**
**Sd/-
Authorized Officer
Unity Small Finance Bank Limited**

‘रिपब्लिकन’चे बेगीच विजयी

वॉशिंग्टन : अलास्कामधील प्रतिनिधीगृहाच्या एकमेव जागेवर रिपब्लिकन पक्षाचे निक बेगीच पुन्हा विजयी झाले आहेत. नुकत्याच झालेल्या मध्यावधी निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाने अमेरिकी काँग्रेसवर वर्चस्व मिळविले आहे.

‘जीटीए’तून विकासगाथा

नरेंद्र मोदी यांनी ११ वर्षांतील बदल केले अधोरेखित

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. १९ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बहुचर्चित व्हिडिओ गेम ‘ग्रँड थेफ्ट ऑटो’ (जीटीए) मधील प्रतिमांचा आधार घेत, गेल्या ११ वर्षांतील भारताच्या विकासाचा लेखाजोखा मांडला आहे. ‘जीटीए-५’ आणि ‘जीटीए-६’ या व्हिडिओ गेमचा संदर्भ देत पंतप्रधान मोदींनी २०१३-१४ मधील देशाची स्थिती आणि सध्याची आकडेवारी यांची तुलना करून अर्थव्यवस्था, गरिबी, स्वच्छता, सौरऊर्जा, अवकाश, संरक्षण निर्यात आणि अंतर्गत सुरक्षा या क्षेत्रांतील भारताच्या विकास प्रवासाचा आढावा मांडला.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘एक्स’वर हा लेखाजोखा पोस्ट करताना मोदी यांनी, ‘‘भारत आता एक पूर्णपणे नवा खेळ खेळत आहे!’’ असे म्हणत, मे २०१४ मध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वीची भारताची स्थिती आणि सध्याची परिस्थिती यांची नऊ क्षेत्रांतील तुलना करणाऱ्या दहा स्लाईड्स प्रसिद्ध केल्या आहेत.

त्यात सप्टेंबर २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘जीटीए-५’ या गेमपासून ते आगामी ‘जीटीए-६’पर्यंतच्या कालावधीचा संदर्भ देत ही तुलना केली. तसेच, उद्योजकांची संघटना असलेल्या ‘फिक्की’ संस्थेच्या वार्षिक सभेमध्ये बोलतानाही पंतप्रधानांनी हा संदर्भ देत देशाच्या प्रगतीवर भाष्य केले.

आर्थिक क्षेत्रातील प्रगती अधोरेखित करताना पंतप्रधानांनी, ‘‘पूर्वी ‘फ्रॅजाइल फाइव्ह’ (कमकुवत अर्थव्यवस्था असलेल्या पाच देशांच्या यादीत) समावेश असलेला भारत आता जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनला.

संरक्षण क्षेत्राचा उल्लेख

संरक्षण क्षेत्रातही भारताने मोठी मजल मारल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. “पूर्वी मोठ्या प्रमाणावर संरक्षण सामग्री आयात करणारा भारत आता ८० हून अधिक देशांना लष्करी उपकरणांची निर्यात करत आहे,’ असे या स्लाइडमध्ये नमूद करण्यात आले असून ब्रह्मोस क्षेपणास्त्राचा संदर्भ त्यात देण्यात आला आहे. तसेच अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत नक्षलवादी हिंसाचारग्रस्त जिल्ह्यांची संख्या १८२ वरून शून्यावर आल्याचा दावाही पंतप्रधान मोदी यांनी केला आहे.

‘जीटीए-६’ ही गेम गुन्हेगारांवर आधारित

काँग्रेसचा पंतप्रधान मोदी यांना टोला

लोकप्रिय ‘प्लेस्टेशन’ व्हिडिओ गेम ‘ग्रँड थेफ्ट ऑटो’ची (जीटीए-६) कथा दोन गुन्हेगारांवर आधारित असल्याचे निदर्शनास आणून देत काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी गेल्या बारा वर्षांमध्ये देशात झालेल्या विकासाची माहिती देण्यासाठी या गेमची चित्रे आणि संदर्भांचा वापर करीत तरुणांपर्यंत पोहोचण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नांची खिल्ली उडवली.

‘‘तरुणांपर्यंत पोहोचण्याच्या हताश प्रयत्नात पंतप्रधानांनी सोशल मीडियावर ‘जीटीए-५’ आणि ‘जीटीए-६’ ची चित्रे वापरली आहेत. हा व्हिडिओ गेम दोन गुन्हेगारांवर आधारित आहे. किती समर्पक आहे,’’ असे ‘एक्स’वर लिहिलेल्या खोचक पोस्टमध्ये रमेश यांनी म्हटले आहे.

‘जीटीए-६’ हा गेम ‘व्हाइस सिटी लिओनिडा’ नावाच्या काल्पनिक शहरात घडतो. यातील मुख्य पात्रे ‘जेसन’ आणि ‘लुसिया’ ही दोन गुन्हेगारी प्रवृत्तीची पात्रे असून ते संपूर्ण राज्यात पसरलेल्या एका कटात गुंतलेले असतात अशी या गेमची संकल्पना असून, आपल्या सरकारच्या कामातील विकास आणि मागील सरकारच्या काळातील स्थिती यांची तुलना करण्यासाठी मोदी यांनी गुरुवारी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

‘टीव्हीके’चे आमदार बाबू यांचे निधन

चेन्नई, ता. १९ (पीटीआय) : तमिळनाडूमध्ये यावर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत द्रमुकचे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांचा पराभव करणारे ‘टीव्हीके’ पक्षाचे आमदार व्ही. एस. बाबू (वय ७५) यांचे आज हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर उपचार सुरू होते. कोळत्तूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे बाबू यांना नऊ सप्टेंबरला दीर्घ आजारामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री आणि टीव्हीके संस्थापक सी. जोसेफ विजय आणि द्रमुक अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनीही बाबू यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पूर्वी द्रमुकमध्ये असलेल्या बाबू यांनी एप्रिल २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत कोळत्तूरमधून स्टॅलिन यांचा ८,७९५ मतांच्या फरकाने पराभव केला होता.

फास्ट न्यूज

मोईत्रांच्या वाहनावर दगडाने हल्ला

कोलकता : तृणमूल काँग्रेसच्या



खासदार महुआ मोईत्रा यांच्या वाहनावर नादिया जिल्ह्यात दगड, अंडी आणि काठ्यांनी हल्ला केल्याचा आरोप आहे. भाजप समर्थकांनी हा हल्ला केल्याचे मोईत्रा यांनी म्हटले आहे. पोलिस आणि भाजपकडून यावर प्रतिक्रिया आलेली नाही.

इंदिराजी निर्भय, प्रेमळ होत्या : राहुल

नवी दिल्ली : माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या १०९ व्या जयंतीनिमित्त काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी त्यांना आदरांजली वाहिली. ‘आजी (इंदिरा गांधी) निर्भय, कणखर आणि प्रेमळ होत्या. त्यांची शक्ती माझ्या कुटुंबातील महिलांमध्ये आजही दिसते,’ असे त्यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटले. या वेळी राहुल यानी आपली आई, बहीण आणि भाची यांच्यातील संभाषणाची व्हिडिओ क्लिप टॅग केली.

घुसखोर खेळाडूला ताब्यात घेतले

नवी दिल्ली : वैध व्हिसा आणि प्रवासाची कागदपत्रे नसतानाही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल-३ मध्ये जबरदस्तीने प्रवेश करणाऱ्या हरियानातील खेळाडूला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) जवानांनी पकडले. कुणाल असे त्याचे नाव असून, तो सोनीपतचा रहिवासी आहे. बुधवारी ही घटना घडली. तो पश्चिम बंगालमध्ये प्रशिक्षण घेत होता..

अमृतपाल सिंग २१ रोजी पंजाबमध्ये

अमृतसर : आसाममधील दिब्रुगड तुरुंगात असलेले खासदार अमृतपाल सिंग यांना आजीच्या अंत्यसंस्कारासाठी २१ नोव्हेंबरला पंजाबमध्ये आणण्यात येणार आहे. त्यांना तीन तासांची कोठडी पॅरोल मंजूर झाली आहे. यानुसार शनिवारी दुपारी १२ ते ३ या वेळेत ते मूळ गावी जल्लूपूर खेडा येथे हजर असतील. त्यांच्या प्रवासासाठी आणि सुरक्षेसाठी पोलिसांनी विशेष व्यवस्था केली आहे.

रेडिओ कॉलर हत्तीला बसविला

अंबिकापूर : छत्तीसगडमध्ये सहा ते सात महिन्यांत १६ जणांचा बळी घेतल्याचा आरोप असलेल्या ‘कबरा कान’ नावाच्या हत्तीला वन विभागाने बेशुद्ध करून रेडिओ कॉलर लावला. या मोहिमेत २०० हून अधिक कर्मचारी आणि थर्मल ड्रोनचा वापर करण्यात आला.


काश्मीरमध्ये थंडीचा कडाका

शोपियाँमध्ये तापमान उणे ३.४ अंश

श्रीनगर, ता. १९ : काश्मीर खोऱ्यातील अनेक ठिकाणांचे किमान तापमान गोठणबिंदूच्या खाली घसरले आहे. शोपियाँ येथे सर्वांत कमी उणे ३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर लडाखमधील लेह येथे उणे ७.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे ०.२ अंश सेल्सिअस, तर काझीगुंड येथे उणे ०.८ अंश सेल्सिअस नोंदले गेले. पहलगाम येथे उणे २.८, पुलवामा येथे उणे २.५, बडगाम येथे उणे १.५, अनंतनाग येथे उणे १.४ आणि कुपवाडा येथे उणे १.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गुलमर्ग, कोनिबल पंपोर आणि श्रीनगर विमानतळ येथे प्रत्येकी उणे एक अंश तापमान नोंदले गेले.

लेहमध्ये तापमान घसरले

जम्मू विभागात तापमान गोठणबिंदूच्या वर आहे. मात्र लडाखमधील लेह येथे सर्वांत कमी म्हणजे उणे ७.२ अंश तापमान नोंदले गेले.



जामनगर (गुजरात) : ‘साहायता सेतू’ सरावादरम्यान बचाव साहित्याचे बास्केट वाहून नेताना नौदलाचे ‘ध्रुव एमके ३’ हेलिकॉप्टर.

‘साहायता सेतू’द्वारे हवाई दलाचे शक्तिप्रदर्शन

जामनगरच्या सरावात ड्रोनचाही समावेश

जामनगर, ता. १९ (पीटीआय) : भारतीय हवाई दलाने आज गुजरातमध्ये लढाऊ विमाने, मालवाहू विमाने, हेलिकॉप्टर आणि रिमोटवर चालणाऱ्या ड्रोनच्या माध्यमातून आपल्या वाढत्या हवाई शक्तीचे आणि आपत्तीनिवारण क्षमतेचे भव्य दर्शन घडवले. बहुराष्ट्रीय मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण सरावाचा एक भाग म्हणून या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

जामनगर येथील हवाई तळावर १७ ते १९ नोव्हेंबरदरम्यान ‘साहायता सेतू’ हा वार्षिक संयुक्त मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण सराव पार पडला.

‘जेडीयू’कडून मोर्चेबांधणी सुरू

उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या तयारीला वेग

नवी दिल्ली, ता. १९ (पीटीआय) : संयुक्त जनता दलाने (जेडीयू) पुढील वर्षी उत्तर प्रदेशात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीच्या तयारीला वेग आणला आहे. पक्षाने राज्यातील संघटनात्मक बांधणीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली असून पूर्व उत्तर प्रदेश आणि पूर्वांचल भागातील जागांसाठी चाचपणीही सुरू केली आहे.

‘जेडीयू’चे राष्ट्रीय सरचिटणीस आणि प्रवक्ते राजीव रंजन प्रसाद यांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाचे लक्ष पूर्वांचलवर असले तरी पश्चिम उत्तर प्रदेशासाठी स्वतंत्र प्रभारी नियुक्त करण्यात आला आहे. याद्वारे पश्चिम भागात कार्यकर्त्यांचे संघटन करणे आणि तेथील निवडणूक शक्यतांचा आढावा घेणे हा मुख्य उद्देश असल्याचे पक्षाच्या नेत्यांनी सांगितले. आगामी निवडणूक ‘एनडीए’चा घटक पक्ष म्हणून लढविण्याचा ‘जेडीयू’चा विचार आहे. ‘जेडीयू’चे अध्यक्ष आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे चिरंजीव निशांत कुमार यांनी एक नोव्हेंबरला वाराणसी येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात पक्ष ‘एनडीए’चा भाग म्हणून निवडणूक लढवेल, असे जाहीर केले होते.

नुकत्याच केलेल्या संघटनात्मक फेरबदलात पक्षाने बिहारचे मंत्री श्रवणकुमार यांच्याकडे उत्तर प्रदेशची जबाबदारी सोपवली आहे.

आझम खानविरुद्धची याचिका फेटाळली

नवी दिल्ली, ता. १९ : समाजवादी पक्षाचे नेते आझम खान यांना आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या हंगामी जामिनाच्या आदेशाला आव्हान देणारी सक्तवसुली संचालनालयाची याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. हा केवळ हंगामी जामीन असल्याचे नमूद करीत या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश एम. एम. सुंदरेश आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने नकार दिला.



आझम खान

बीएस-६ वाहनांना पीयूसीत तीन वर्षे मुदत

नवी दिल्ली, ता. १९ (पीटीआय) : प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राच्या (पीयूसी) वैधतेचा कालावधी केंद्र सरकारने बदलला आहे. यामुळे नवीन बीएस-६ खासगी वाहनांना आता तीन वर्षांनी पीयूसी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करावे लागेल. जुन्या वाहनांसाठी मात्र नूतनीकरणाचा कालावधी कमी करण्यात आला आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने १३ नोव्हेंबरला याबाबतचे नवे नियम जाहीर केले. त्यानुसार, सहा वर्षांपर्यंत जुन्या खासगी बीएस-६ वाहनांसाठी पीयूसी प्रमाणपत्र तीन वर्षे वैध असेल. सहा वर्षांपेक्षा जास्त आणि दहा वर्षांपर्यंत जुन्या वाहनांसाठी ही मुदत एक वर्ष असेल.

दहा वर्षांपेक्षा जुन्या वाहनांचे दर सहा महिन्यांनी नूतनीकरण करावे लागेल. व्यावसायिक बीएस-६ वाहनांसाठी सहा वर्षांपर्यंत दोन वर्षे, सहा ते दहा वर्षे वयोगटातील वाहनांसाठी एक वर्ष, तर दहा वर्षांपेक्षा जुन्या वाहनांसाठी सहा महिने अशी वैधता असेल. बीएस-१, बीएस-२ आणि बीएस-३ वाहनांसाठी पीयूसी प्रमाणपत्र तीन महिने, तर बीएस-४ वाहनांसाठी सहा महिने वैध असेल.

‘अक्वान’ गोपाळपूरजवळ धडकण्याची शक्यता

ओडिशामध्ये मुसळधारेचा इशारा

सकाळ न्यूज नेटवर्क

भुवनेश्वर, ता. १९ : ‘अक्वान’ हे तीव्र चक्रीवादळ शुक्रवारी (ता. २०) दुपारपर्यंत ओडिशातील गोपाळपूरजवळ किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता असल्याचा अंदाज ‘आयएमडी’ने गुरुवारी वर्तविला. हवामान विभागाने गुरुवारी सकाळी जारी केलेल्या निवेदनानुसार, बंगालच्या उपसागरात असलेले हे चक्रीवादळ वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. आंध्र प्रदेशच्या उत्तर किनारपट्टीवरील नरसापूर आणि ओडिशातील पुरीदरम्यान, गोपाळपूरच्या पूर्वेला किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. चक्रीवादळ किनारपट्टीवर धडकेल, त्यावेळी वाऱ्याचा वेग ताशी ९० ते १०० किलोमीटर राहण्याची शक्यता आहे.

अतिवृष्टीचा इशारा

हवामान विभागाने गुरुवारी ओडिशातील सहा जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. केंद्रपाडा, जगतसिंगपूर, पुरी, गंजाम, गजपती आणि कंधमाल या जिल्ह्यांचा रेड अलर्टमध्ये समावेश आहे.

बालासोर, मयूरभंज, भद्रक, जाजपूर, कटक, नयागड, खुर्दा, रायगड, कोरापुट आणि मलकानगिरी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. येथे काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

समानतेच्या निर्देशांकात गोवा देशात अव्वल

पणजी, ता. १९ : देशातील २८ राज्यांमध्ये समान संधी आणि सुविधांच्या उपलब्धतेच्या बाबतीत गोव्याने अव्वल स्थान पटकावले आहे. ओ. पी. जिंदाल ग्लोबल विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या ‘ॲक्सेस (इन)इक्वॅलिटी इंडेक्स २०२६’मध्ये गोव्याने ०.६८ गुणांसह देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

राज्यातील नागरिकांना मूलभूत सुविधा, आरोग्यसेवा आणि शिक्षणाच्या क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या संधींचे या निर्देशांकातून ही बाब समोर आली आहे. या निर्देशांकात गोव्याने विशेषतः मूलभूत सुविधा आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या अहवालानुसार, गोव्यातील ९१.९ टक्के कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ९० टक्के नागरिक पक्क्या घरांमध्ये वास्तव्यास आहेत. पिण्याचे पाणी व सुरक्षित निवारा या सुविधांची उपलब्धता सामाजिक विकासातील महत्त्वाचा घटक ठरली आहे.

GOVERNMENT OF JHARKHAND
JHARKHAND STATE RURAL ROADS DEVELOPMENT AUTHORITY (JSRRDA)

NOTICE INVITING REQUEST FOR PROPOSAL (RFP)
For Appointment of an Independent C&AG-Empanelled Chartered Accountant Firm for Verification and Certification of GST Claims of Contractors under PMGSY
NIT/RFP No.: 32/ 2026-27-1615(Encl) **Date:** 18.11.2026

Jharkhand State Rural Roads Development Authority (JSRRDA), Rural Works Department, Government of Jharkhand, invites Request for Proposals (RFP) from eligible and experienced Chartered Accountant firms for appointment as an independent agency to verify and certify package-wise GST claims submitted by contractors executing works under the Pradhan Mantri Gram Sadak Yojana (PMGSY) and other PMGSY verticals, to the extent covered by the applicable NRIDA instructions/guidelines under Pradhan Mantri Gram Sadak Yojana (PMGSY).

1. Name of Work:
Engagement of Chartered Accountant firms for appointment as an independent agency to verify and certify package-wise GST claims submitted by contractors executing works under the Pradhan Mantri Gram Sadak Yojana (PMGSY) and other PMGSY verticals, to the extent covered by the applicable NRIDA instructions/guidelines under Pradhan Mantri Gram Sadak Yojana (PMGSY).

2. Scope of Work:
The selected agency shall undertake the assigned activities in accordance with the guidelines, technical specifications and instructions contained in RFP/NIT issued by JSRRDA.

Availability of RFP Document:
The detailed RFP document containing the scope of work, terms and conditions, eligibility criteria and evaluation methodology can be obtained/downloaded from website: www.pmgsytenderjhr.gov.in

Particulars	Date
Publication of RFP Notice	20.11.2026
Availability of RFP Document	21.11.2026, 10.00 AM
Last date for submission of queries	27.11.2026, 3.00 PM
Pre-bid meeting	27.11.2026, 3.00 PM
Last date of proposal submission	07.12.2026, 5.00 PM
Date of opening of proposals	07.12.2026, 5.30 PM

Engineer-in-Chief
JSRRDA
PR 394188 (Rural Work Department) 26-27 (D)

INFRA.MARKET
A BUILDING MATERIALS PLATFORM
हेला इन्फ्रा मार्केट लिमिटेड
सीआयएन: U46632MH2016PLC283737
नोंदणीकृत कार्यालय: 4 था मजला, कार्यालय क्र.401, ओलेथिया बिझनेस स्पेसेस, प्लॉट क्र.ए-184 आणि ए-185, रस्ता क्र.16झेड, अशार आयटी पार्कच्या समोर, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम) 400604, महाराष्ट्र, भारत.
संपर्क क्र.: +91 9606350000 ; **ईमेल आयडी:** cs@infra.market, **वेबसाइट:** www.infra.market

टपाल मतदानाची नोटीस आणि ई-मतदानासंबंधी माहिती

हेला इन्फ्रा मार्केट लिमिटेडच्या (‘कंपनी’) सभासदांना याद्वारे **सूचित** करण्यात येते की, कंपनी अधिनियम, 2013 चे कलम 108, 110 आणि इतर लागू तरतुदी, जर असल्यास, तसेच **कंपनी** (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, 2014 चे नियम 20 आणि 22 आणि लागू मर्यादेपर्यंत सेबी (सूचीकरण आबंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमने, 2015, इन्स्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांद्वारे जारी सेक्रेटरियल स्टँडर्ड्स ऑन जनरल मीटिंग (एसएस-2) (यासंबंधात, कॉरपोरेट कामकाज मंत्रायल **(“एमसीए परिपत्रके”)** भारत शासनाद्वारे जारी, कोणत्याही सांविधिक सुधारणा, त्यामधील बदल किंवा त्यातील पुनरधिनियमिती, परिपत्रके, अधिसूचना, मार्गदर्शक निर्देश, जर असल्यास, समाविष्ट), कंपनी केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने **(“दुरस्थ ई-मतदान”)** टपाल मतदानाद्वारे निम्नलिखित विशेष ठरावावर सभासदांची मंजुरी प्राप्त करू इच्छित आहे:

अनु. क्र.	ठरावाचे वर्णन	ठरावाचा प्रकार
1	कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यातून हरयाणा राज्यामध्ये स्थलांतरित करण्याबाबत आणि त्या अनुषंगाने कंपनीच्या संस्थापन समयलेखाच्या कलम 2 मध्ये सुधारणा करण्याबाबत विचार करणे व मंजुरी देणे.	विशेष

सभासदांना याद्वारे कळवण्यात येत आहे की:

1. ज्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेसेस कंपनी/डिपॉझटरीज/रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजन्ट यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि शुक्रवार, 13 नोव्हेंबर 2026 रोजी **(“कट-ऑफ तारीख”)** ज्यांची नावे सभासदांच्या रजिस्टरमध्ये आणि/किंवा लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये आहेत, त्या सभासदांना गुरुवार, 19 नोव्हेंबर 2026 रोजी केवळ ईमेलद्वारे टपाल मतदान नोटीस **(“नोटीस”)** पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. तसेच एमसीए परिपत्रकांनुसार टपाल मतपत्रिका आणि प्री-पेड बिझनेस रिप्लाय लिफाफा यांसह टपाल मतदानाच्या नोटिशीची वास्तविक प्रत सभासदांना पाठवण्यात आलेली नाही. म्हणून, सभासदांनी केवळ दुरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे त्यांनी सहमती किंवा असहमती कळवणे आवश्यक आहे. दुरस्थ ई-मतदान सुविधा प्रदान करण्यासाठी कंपनीने केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड, रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजन्ट **(“केफिन टेक”)** यांची सेवा घेतलेली आहे.
2. सदर नोटीस कंपनीच्या **(https://www.infra.market)** या वेबसाइटवर आणि केफिनकेटच्या **(https://evoting.kfintech.com)** या वेबसाइटवरदेखील प्रदर्शित करण्यात येईल. स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या **(www.bseindia.com)** या वेबसाइटवर नोटीस पाहता येऊ शकेल. नोटीस प्राप्त न झालेले सभासद सदर वेबसाइट्सवरून ती डाउनलोड करू शकतात. डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल ॲड्रेसेस नोंदणीकृत केलेले नाहीत, ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे त्यांच्या ई-मेल ॲड्रेसेसची नोंद करू शकतील.
3. कट-ऑफ तारखेला, वरील मुद्दा 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सभासदांच्या रजिस्टरमध्ये आणि/किंवा लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये ज्या सभासदांची नावे असतील, तेच सभासद दुरस्थ ई-मतदान सुविधा प्राप्त करण्यासाठी हक्कदार असतील. सभासदाचा (सभासदांचा) मतदानाचा हक्क, कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार कट-ऑफ तारखेला सभासदांच्या नावाने (नावांनी) नोंदणीकृत, त्यांच्या भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या हिश्शानुसार विचारात घेण्यात येईल.
4. दुरस्थ ई-मतदानाला शुक्रवार, 20 नोव्हेंबर 2026 रोजी सकाळी 9.00 वाजता (आयएसटी) सुरुवात होईल आणि शनिवार, 19 डिसेंबर 2026 रोजी संध्याकाळी 5.00 वाजता (आयएसटी) ते समाप्त होईल. त्यानंतर केफिनटेकद्वारे दुरस्थ ई-मतदान मॉड्युल अकार्यान्वित करण्यात येईल आणि सदर तारखेनंतर व वेळेनंतर ई-मतदान करण्याला अनुमती असणार नाही. सभासदाने ठरावावर एकदा का मतदान केल्यावर, सभासदाला तदनंतर त्यामध्ये बदल करण्यास किंवा पुन्हा एकदा मतदान करण्यास अनुमती असणार नाही. दुरस्थ ई-मतदानासाठीची तपशीलवार प्रक्रिया/सूचना नोटिशीमधील नोंदींमध्ये देण्यात आलेल्या आहेत.
5. कंपनीच्या संचालकीय मंडळाने न्याय्य व पारदर्शक पद्धतीने, केवळ दुरस्थ ई-मतदान प्रकियेद्वारे टपाल मतदान पार पाडण्यासाठी आणि त्यामध्ये टाकलेल्या मतांचे परिनिरीक्षण करण्यासाठी, श्रीमती रिया अहुजा (सभासद एसीएस क्र.29556 सी.पी. क्र.16838), प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची परिनिरीक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे.
6. कोणत्याही शंका असल्यास, सभासद हे वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा (एफएक्यूजचा) आणि **(https://evoting.kfintech.com)** च्या ‘डाउनलोड’ विभागामध्ये उपलब्ध सभासदांसाठीच्या ई-मतदान वापरकर्ता पुस्तिकेचा संदर्भ घेऊ शकतील किंवा केफिनटेकला 1800 309 4001 वर (टोल फ्री) संपर्क साधू शकतील ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही शंका/समस्या असल्यास, सभासद हे श्री. हनुमंत राव पत्री, एव्हीपी, केफिनटेक यांच्याशी दूरध्वनी क्र. 040 67162222 वर संपर्क साधू शकतील किंवा **(einward.ris@kfintech.com)** येथे ईमेल पाठवू शकतील किंवा श्रीमती पिनल पटेल, कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी यांना कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये किंवा ईमेल आयडी: **(cs@infra.market)** येथे किंवा 91 9606350000 वर संपर्क साधू शकतील.
7. परिनिरीक्षकाच्या अहवालासह टपाल मतदानाचे निकाल कंपनीच्या **(www.infra.market)** या वेबसाइटवर आणि केफिनटेकच्या **(https://evoting.kfintech.com)** या वेबसाइटवर प्रदर्शित करून, सोमवार, 21 डिसेंबर 2026 रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येतील. सदर निकाल हे स्टॉक एक्स्चेंजला म्हणजेच बीएसई लिमिटेडलाही **(www.bseindia.com)** येथे कळवण्यात येतील. ठराव, आवश्यक मताधिक्याने संमत झाल्यास, तो दुरस्थ ई-मतदानासाठी नमूद शेवटच्या तारखेला म्हणजेच शनिवार, 19 डिसेंबर 2026 रोजी संमत झाल्याचे मानण्यात येईल.

सभासदांना नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व नोंदी आणि विशेषतः, दुरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत, काळजीपूर्वक वाचण्याची विनंती करण्यात येत आहे.

संचालकीय मंडळाच्या आदेशानुसार
हेला इन्फ्रा मार्केट लिमिटेड
स्वाक्षरी
पिनल पटेल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सभासद क्र. A27910

स्थळ: ठाणे, महाराष्ट्र
दिनांक: 19 नोव्हेंबर 2026

पश्चिम रेल्वे
कल्व्हर्टस व ड्रेन्सची वार्षिक सफाई

सीनि. डीईएन (दक्षिण) एमएमसीटी हे आमंत्रित करीत आहेत :

अ. क्र.	निविदा सूचना क्र. व दिनांक	कार्य व ठिकाण	कामाचे अंदाजित मूल्य (रु.)	इरठे (रु.)
१.	BCT/26-27/226, dt. 17.11.2026	चर्चगेट (सीसीजी)- विरार (व्हीआर) अनुभाग - एसएसई (पी वे) दादर (डीडीआर) व अंधेरी (एडीएच) अनुभाग यांच्या कार्यकक्षेअंतर्गत मान्सून २०२७ करिता कल्व्हर्टस व कल्व्हर्टस शी जोडलेल्या नाल्यांची वार्षिक सफाई.	रु.१४,०४,०३९.८१	रु.२८,१००.००
२.	BCT/26-27/227, dt. 17.11.2026	चर्चगेट (सीसीजी)- विरार (व्हीआर) अनुभाग - एसएसई (पी वे) बोरिवली (बीव्हीआय) अनुभाग यांच्या कार्यकक्षेअंतर्गत मान्सून २०२७ करिता कल्व्हर्टस व कल्व्हर्टस शी जोडलेल्या नाल्यांची वार्षिक सफाई.	रु.९,५७,६०६.४२	रु.१९,२००.००
३.	BCT/26-27/228, dt. 17.11.2026	चर्चगेट (सीसीजी)- विरार (व्हीआर) अनुभाग - एसएसई (पी वे) दादर (डीडीआर) व अंधेरी (एडीएच) अनुभाग यांच्या कार्यकक्षेअंतर्गत सन २०२७ करिता डी. जी. पम्पद्वारे पावसाळ्यादरम्यान लो लेव्हल एरियातील ट्रंकमधील पाणी उपसून काढण्याचे काम.	रु.१,६७,४८,१००.००	रु.३,३५,०००.००
४.	BCT/26-27/229, dt. 17.11.2026	चर्चगेट (सीसीजी)- विरार (व्हीआर) अनुभाग - सीनि. डीईएन (एस) अनुभागांतर्गत रेल्वेकरिता रिसायकलिंग सुविधेसह वाहनावर बसवण्यात आलेल्या उच्च क्षमतेच्या सक्षम तथा जेटिंग मशीन चा वापर करून भूमिगत पर्जन्य जलवाहिन्यांतील गाळ काढणे व संपूर्ण सफाई करण्याचे काम.	रु.४७,००,८००.००	रु.९४,०००.००

वरील सर्व निविदांकरिता - सादरीकरण दिनांक व वेळ - दि. १५.१२.२०२६ रोजी दु. ३.०० वा., **उघडण्याचा दिनांक व वेळ :** दि. १५.१२.२०२६ रोजी दु. ३.३० वा. पुढील तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाइट **www.ireps.gov.in** येथे भेट द्या. **0820**

लाईक करा : facebook.com/WesternRly • फॉलो करा : x.com/WesternRly

स्नोमॅन लॉजिस्टिक्स लिमिटेड
SNOWMAN
सीआयएन : L15122MH1993PLC285633
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट क्र. एम - ८, तळोजा इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, रायगड, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४१० २०६. **दूर. :** + ९१ २२ ३९२७ २००४
कॉर्पोरेट कार्यालय : विंग बी, ४ था मजला, प्रायस प्लॅटिनम, साकेत डिस्ट्रिट सेंटर, साकेत, नवी दिल्ली - ११० ०१७. **दूर. :** + ९१ ११ ४०५५४५००
वेबसाइट : www.snowman.in **ई-मेल :** investorrelations@snowman.in

पोस्टल बॅलेटची सूचना

स्नोमॅन लॉजिस्टिक्स लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या कलम १०८ आणि ११० व इतर लागू तरतुदी; कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ (नियम) चे नियम २० आणि २२; कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे (एमसीए) जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० (दिनांक ८ एप्रिल २०२०), क्र. १७/२०२० (दिनांक १३ एप्रिल २०२०) आणि त्यानंतरची संबंधित परिपत्रके (ज्यामध्ये २२ सप्टेंबर २०२५ रोजीचे परिपत्रक क्र. ०३/२०२५ चा समावेश आहे) ,(यापुढे एमसीए परिपत्रके म्हणून उल्लेखित) (यामध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश) तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सेबी) च्या लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स विनियम, २०१५ (सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स) चे नियम ४४ व इतर लागू रेग्युलेशन्स यामध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश), इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) द्वारे जारी केलेले जनरल मीटिंग्ज संबंधीचे सेक्रेटरिअल स्टँडर्ड-२ (एसएस-२) ; तसेच इतर संबंधित कायदे, नियम आणि तरतुदी यामध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश) यांच्या अनुषंगाने, कंपनी खालील कामकाजासाठी कंपनी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (रिमोट ई व्होटिंग) आपल्या सदस्यांची मंजुरी पोस्टल बॅलेटद्वारे प्राप्त करू इच्छित आहे.

प्रस्तावित ठराव	ठरावाचा प्रकार
कंपनीचे बिगर कार्यकारी स्वतंत्र संचालक म्हणून श्री. अरुण गोयल (डीआयएन : ०००४४८३०) यांच्या नेमणुकीस मंजुरी देणे.	विशेष ठराव.

एमसीए परिपत्रकांनुसार, कंपनीने **शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ (कट-ऑफ तारीख)** रोजी सदस्य नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजकडून प्राप्त झालेल्या लाभार्थी मालकांच्या यादीत ज्या सदस्यांची नावे आहेत आणि ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत, अशा सदस्यांना **गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६** रोजी केवळ ई-मेलद्वारे संबंधित सूचनेत विहित ठरावांवर मंजुरी प्राप्त करण्यासाठी पोस्टल बॅलेट सूचना पाठवली आहे. ज्या व्यक्ती कट-ऑफ तारखेला सदस्य नाहीत, त्यांनी या सूचनेकडे केवळ माहितीसाठी म्हणून पाहावे. एमसीए परिपत्रकांद्वारे मिळालेल्या सवलतींनुसार, कंपनीने ही सूचना केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवली आहे; या पोस्टल बॅलेट प्रक्रियेसाठी सदस्यांना कागदोपत्री स्वरूपातील सूचना, पोस्टल बॅलेट फॉर्म किंवा प्रीपेड बिझनेस लिफाफे पाठवले जाणार नाहीत.

त्यानुसार, कट-ऑफ तारखेला कंपनीचे शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी, त्यांची संमती वा विरोध यासंदर्भात, केवळ रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे आपली मते कळवणे आवश्यक आहे. पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान कसे करावे, याबद्दलच्या सूचना दिल्या आहेत.

कंपनीने आपल्या सर्व सदस्यांना ई-व्होटिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) (आरटीए) यांची नियुक्ती केली आहे. ई-व्होटिंगचा कालावधी **शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ (सकाळी ९:०० वाजता, भा प्र वे) सुरू होईल आणि शनिवार, १९ डिसेंबर २०२६ (संध्याकाळी ५:०० वाजता, भा प्र वे) संपेल. त्यानंतर लिंक इनटाइमद्वारे ई-व्होटिंग मॉड्यूल बंद केले जाईल.** एकदा का सदस्याने एखाद्या ठरावावर आपले मत नोंदवले की, त्यानंतर त्याला ते बदलण्याची किंवा त्याच ठरावावर पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. ई-व्होटिंगसाठी सविस्तर सूचना या सूचनेचाच एक भाग म्हणून दिल्या आहेत; तरी सदस्यांनी मतदान करण्यापूर्वी त्या काळजीपूर्वक वाचून घ्याव्यात.

ज्या सदस्यांकडे कट-ऑफ तारखेला कागदोपत्री स्वरूपातील किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील शेअर्स आहेत आणि ज्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत नाहीत, त्यांनी त्यांचे ईमेल आयडी कंपनीच्या आरटीए कडे किंवा आपापल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवावेत. ज्या सदस्यांनी त्यांचे केवायसी तपशील अद्ययावत केलेले नाहीत, त्यांना विनंती आहे की त्यांनी फॉर्म आयएसआर-१ आणि इतर संबंधित फॉर्म कंपनीच्या आरटीए कडे सादर करून, ईमेल आयडीसह आपले केवायसी तपशील अद्ययावत करावेत. ज्या सदस्यांकडे डीमॅट स्वरूपातील शेअर्स आहेत, ते त्यांचे केवायसी तपशील (ईमेल पत्त्यासह) आपापल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज) कडे अद्ययावत करू शकतात. ज्या सदस्यांनी आधीच आपले ईमेल पत्ते नोंदवले आहेत, त्यांना विनंती आहे की त्यांनी आपले ईमेल पत्ते त्यांच्या डीपी किंवा आरटीए यांच्याकडे वैध स्थितीत ठेवावेत, जेणेकरून त्यांना सर्व सूचना आणि दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्राप्त होऊ शकतील.

ही नोटीस आणि त्यासोबतचे स्पष्टीकरणात्मक विवरण कंपनीच्या **www.snowman.in** या वेबसाइटवरून डाउनलोड करता येईल. हे दस्तऐवज आरटीए यांच्या **https://instavote.linkintime.co.in/** या वेबसाइटवर, तसेच स्टॉक एक्स्चेंजच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** या वेबसाइट्सवरही उपलब्ध आहेत.

पोस्टल बॅलट प्रक्रिया निःपक्ष व पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्यासाठी परीनिरीक्षक म्हणून संचालक मंडळाने मेसर्स नागेंद्र डी. राव अँड असोसिएट्स एलएलपी,कंपनी सेक्रेटरीजची एक मर्यादित दायित्व भागीदारी संस्था (संस्था नोंदणीकरण क्र. : एएके - ४६९८) (पीअर रिव्ह्यू सर्टिफिकेट नं. ५८२७/२०२४) - श्री. नागेंद्र डी राव, सदस्यत्व क्र. एफसीएस ५५५३, सीओपी ७७३१ यांच्या प्रतिनिधित्वांतर्गत, त्यांच्या अनुपस्थितीत श्रीमती मैत्री भट, सदस्यत्व क्र. एफ१३६५५ व सीओपी १८५७६, पदसिद्ध भागीदार यांची नेमणूक केली आहे.

पोस्टल बॅलेटच्या मतदानाचे निकाल कंपनीद्वारे **२२ डिसेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी** जाहीर केले जातील. हे निकाल कंपनीच्या नोंदणीकृत/कॉर्पोरेट कार्यालयात प्रदर्शित केले जातील, तसेच लिंक इनटाइम आणि ज्या स्टॉक एक्स्चेंजवर कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत, त्यांना कळवले जातील. याव्यतिरिक्त, हे निकाल परीनिरीक्षकांच्या अहवालासह कंपनीच्या **www.snowman.in** या वेबसाइटवरही उपलब्ध करून दिले जातील. ई-मतदानासह पोस्टल बॅलेटच्या संदर्भात काही तक्रार असल्यास किंवा काही स्पष्टीकरण हवे असल्यास, सदस्य लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी **enotices@in.mpms.mufg.com** या ईमेल पत्त्यावर किंवा ०२२-४९१८ ६००० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात; अथवा कंपनी सचिव यांच्याशी **investorrelations@snowman.in** या ईमेल पत्त्यावर संपर्क साधू शकतात.

स्नोमॅन लॉजिस्टिक्स लिमिटेडकरिता
सही/-
रिचा गुप्ता
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी, एसीएस नं. ५६५२३

दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६
ठिकाण : नवी दिल्ली